# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/11/2022 (शनिवार) सायंकाळ

---

## दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर:— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा बाजारचौक, कळमेश्वर दिनांक १९/११/२०२२ चे १०.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— शुभम अरूण ईखार, वय २४ वर्ष, रा. बाजारचौक कळमेश्वर हे घरासमोरील सिमेंट रोडचे कडेला ब्रश करीत फिरत होते. तेव्हा समोरून एक काळया रंगाची स्कॉर्पीओ क्र. एम. एच.—३४/ए. एम. २४४६ चा चालक आरोपी नामे— आशिष बरगट याने फिर्यादीच्या अंगावर आणली तेव्हा फिर्यादी थोडा बाजुला हटला व आरोपीला म्हटले की, ‘‘पाहुन गाडी चालव’’ असे हटकले तेव्हा यातील आरोपीने गाडी थांबवुन गाडीमधुन आरोपीने हातामध्ये लोखंडी रॉडने फिर्यादीचे डावे पायावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द ३२४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी मुंडे, मो. नं. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर